पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नागरवस्ती विकास योजना विभाग,
मुख्य प्रशासकीय इमारत - तळमजला, पिंपरी - ४११०१८.

**समुह संघटक या पदांवर मानधनावर हंगामी नेमणूकीबाबत**

**जाहिर प्रकटन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात, महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सदर योजनांचा वस्तीपातळीवर प्रचार व प्रसार करणे, तसेच योजनांसंदर्भातील इतर सर्व कामकाजाकरीता "समुह संघटक" या अभिनामाची २० पदे सहा महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरावयाची असून त्याकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून आरक्षण तक्त्यात नमूद केलेनुसार अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | दरमहा एकत्रित मानधन | शैक्षणिक अर्हता | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | इमाव | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | समुह संघटक | २० | र.रू १९,४९५/- + वाहन भत्ता र.रू १३००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पदवी २) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील समाजकार्य विषयातील MSW उत्तीर्ण आणि MS Office/MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | ३ | १ | १ | १ | ४ | ३ | २ | ५ | २० |

**अटी व शर्ती :-**

१) प्रस्तुतच्या मानधनावर करावयाच्या नेमणूका ह्या पूर्णपणे तात्पुरत्या / हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी नेमणूकीचा हक्क सांगता येणार नाही.

२) समुह संघटक पदावरील नेमणुका दरमहा एकवट मानधनावर करार पद्धतीने विहीत शैक्षणिक पात्रता, शैक्षणिक गुणवत्ता व नागरवस्ती विकास योजना विभागाकडील किंवा शासकीय व निमशासकीय विभागाकडील कामाचा अनुभव इ. च्या आधारे परिक्षण करुन व गुणानुक्रमे निवड व प्रतिक्षा यादी तयार करुन सहा महिने कालावधीसाठी केल्या जातील.

३) ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय त्यांची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

४) समुह संघटक जागांसाठी शारिरीकदृष्ट्या सक्षम असणारे व यापुर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागाकडे कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेदवारांसाठी वय वर्षे ५० पर्यंत व इतर उमेदवारांना शासन निर्णयानुसार खुल्या वर्गासाठी वयोमर्यादा ३८ वर्षे इतकी असून मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत सदर वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील.

५) उपरोक्त पदासाठी विहीत नमुन्यातील अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला असून सदर संकेतस्थळावरील नोकरीविषयक या सदरामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी अर्ज व प्राधान्यक्रमाचा नमुना डाऊनलोड करून घ्यावा. सदर विहीत नमुन्यातील अर्ज सुवाच्च हस्ताक्षरात भरून, स्वत:चा नव्याने काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो, आधारकार्ड, वयाचा पुरावा, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र, अनुभवाचा पुरावा इ. सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागात पोस्टाद्वारे अथवा समक्ष दि. ०६/ १२ /२०२० पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पोहोच होतील अशा पद्धतीने पाठवावेत. सदर तारखेनंतर उशीरा येणारे अर्जांचा विचार केला जाणार नाही अथवा त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही तसेच पत्रव्यवहार केला जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी

६) प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून उमेदवारांची पात्रता यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर www.pcmcindia.gov.in प्रसिद्ध करणेत येईल.

७) पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेणेत येईल. सदर लेखी परिक्षेस येणे - जाणेकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

८) लेखी परिक्षा बहुपर्यायी एकूण १०० गुणांची असून प्रत्येक प्रश्नास २ गुण याप्रमाणे ५० प्रश्नांची घेणेत येईल. साधारणत: MSW विषयाचा अभ्यासक्रम, सामान्यज्ञान, चालू घडामोडी, वस्तीपातळीवरील कामकाजाचे ज्ञान इ. बाबींवर लेखी परिक्षा घेण्यात येईल.

९) लेखी परिक्षेचे वेळापत्रक व स्थळ मनपाचे संकेत स्थळावर (www.pcmcindia.gov.in ) प्रसिद्ध करणेत येईल व उमेदवारांचे अर्जात नमूद केलेल्या मोबाईलवर SMS द्वारे कळविण्यात येईल.

१०) फक्त MSW उत्तीर्ण व MS Office/MSCIT परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावेत. या व्यतिरीक्त इतर शैक्षणिक अर्हता असलेल्या उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविले जातील व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही तसेच तोंडी अथवा लेखी तक्रार स्विकारली जाणार नाही.

११) लेखी परिक्षेनंतर सदर पदाची निवड यादी व प्रतीक्षा यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर नंतर प्रसिद्ध करणेत येईल. सदर प्रतिक्षा यादीचा कालावधी ६ महिने राहील.

१२) नेमणूक झालेल्या उमेदवारास र. रू. ५००/- च्या स्टँप पेपरवर स्वखर्चाने हमी पत्र देणे बंधनकारक राहील.

१३) नेमणूक झालेल्या उमेदवारास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे परिसरात / नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रात व संगणकावर प्रत्यक्ष कामकाज करणे बंधनकारक राहील.

१४) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय/ आदेश/ अटी शर्ती लागु राहतील.

१५) सदरच्या नेमणूका करण्याचे अथवा रद्द करण्याचे तसेच अपरिहार्य परिस्थितीत सदरची लेखी परीक्षा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१६) नागरवस्ती विकास योजना विभाग मुख्य कार्यालय दूरध्वनी क्रमांक ०२०-६७३३-१५२६/१५२९.

तरी इच्छुक उमेदवारांनी दि. ०६/११/२०२० पर्यंत विहीत नमुन्यातील अर्ज व अनुषंगिक कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह पिंपरी चिंचवड महानगरपालिका, नागरवस्ती विकास योजना विभाग, मुंबई – पुणे रस्ता, पिंपरी – ४११०१८. येथे पोहोच होतील अशा पद्धतीने पाठवावेत.

( संतोष पाटील )
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

जाहिरात क्र. १ /२०२०
क्र. नावियो/१/कावि/५६७/२०२०
दिनांक २०/१०/२०२०

# अर्ज नमुना

| पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

प्रति,

मा. उप आयुक्त
नागरवस्ती विकास योजना विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

**विषय – मानधनावर तात्पुत्या स्वरूपात "समुह संघटक" या पदावर नेमणुकीबाबत...**

**संदर्भ –** दिनांक / /२०२० रोजीच्या------------------------------------ या वर्तमानपत्रामध्ये तसेच महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेली जाहिरात क्र. /२०२०

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी "समुहसंघटक" या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी मानधन पध्दतीने निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

(आडनाव) (स्वत:चे नाव) (वडिलांचे/पतीचे नाव)

१. संपूर्ण नाव : ------------------------------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) : ------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------

३. मोबाईल नं. -------------------------------------------------------------------------------------------------

४. जन्मतारीख : ------------------------ (DD/MM/YY) ५. लिंग : स्त्री / पुरूष

६. जात: --------------------------- SC ☐ ST ☐ VJ(A) ☐ NT(B) ☐ OBC ☐ OPEN ☐

७. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील :

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | एकूण प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८. इतर अर्हता व अनुभवाचा तपशील : ------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्या विरूध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :

दिनांक : / /२०२०

अर्जदाराची स्वाक्षरी